# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/10/2023 (रविवार) सकाळ

### पोस्टे केळवद हददीतील तिडंगी पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी गटग्रामपंचायत निवडणुक या अनुषंधाने राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे करीता तसेच कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेव नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने आज दि. २९/१०/२०२३ रोजी चे १२.५० वा. चे दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा नागपुर (ग्रा) येथील स्टॉफ पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे साहेब याचे सह पोलीस हवालदार राजेद्र रेवतकर, रोशन काळे, आशिष मुगले, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, प्रमोद भोयर, संजय बान्ते महिला पोलीस हवालदार कविता बचले पोलीस नायक वनिता शेंडे, चालक पोलीस अंमलदार सुमित बांगडे यांचे सह खाजगी, तसेच शासकीय वाहणाने सावनेर उपविभागातील पोस्टे केळवद हददीतील मौजा तिडंगी पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू गाळणा—या इसमावर कार्यवाही करण्यात आली. तसेच पोस्टे केळवद येथील ठाणेदार स.पो.नि अमितकुमार आत्राम, पोलीस महीला व पुरुष कर्मचारी स्टॉफसह रेड केली असता अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०७ महिला आरोपी हे मोहफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून एकुण मोहाफुल रसायण सडवा ९,५०० लिटर एकुण किं. ७,६०,०००/— रु व मोहाफुल गावठी दारु एकुण किंमती ३७५ लिटर एकुण कि. ३७,५००/—रु व दारु गाळण्याचे साहीत्य निळया प्लास्टिक ड्रम, लोखंडी ड्रम, जळाऊ लाकुड, रबर पाईप, जर्मन घमिले, स्टील झाकणी एकुण किंमती ६६४००/—रु असा एकुण किं ८६८९००/—रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (बी) (सी) (ई) (एफ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण मा. श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण मा. श्री अजय चांदखेडे उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा नागपुर (ग्रा), सपोनि अमितकुमार आत्राम, पो.हवा राजेद्र रेवतकर, रोशन काळे, आशिष मुंगले, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, प्रमोद भोयर, संजय बान्ते मपोहवा कविता बचले. मपोना वनिता शेंडे, चालक सुमित बागडे यांचे सह संयुक्तरित्या कार्यवाही करण्यात आली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर